# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

'ज्ञानगंगोत्री', गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक -४२२२२२


क्रमांक.:यचममुवि/कुका-११/२०२०/60 दिनांक : १६/०३/२०२०

## परिपत्रक

**विषय: करोना विषाणू (कोव्हीड-19) चा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेबाबत..**

**संदर्भ :** (1) **उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे पत्र क्र. संकीर्ण-2020/सं.क्र.114/20) विशि-1 दि. 14 मार्च 2020 चे पत्र**

(2) **शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे उशिस/कोरोना/मवि-1/2020/3778 दि. 14 मार्च 2020 चे पत्र**

संदर्भांकित निर्देशानुसार करोना (कोव्हीड-19) विषाणूच्या वाढत्या संसर्गाच्या पार्श्वभूमिवर प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्याच्यादृष्टीने विद्यापीठ, विद्यापीठाचे विभागीय केंद्रे व सर्व अभ्यास केंद्रातील शैक्षणिक अध्यापनाचे तसेच संपर्क सत्रांचे कामकाज दिनांक 31 मार्च 2020 पर्यंत बंद ठेवण्यात येत आहे. तसेच विद्यापीठ मुख्यालयातील व विभागीय केंद्रांवरील बी.बी.ए. शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांना दिनांक 31 मार्च 2020 पर्यंत सुट्टी देण्यात येत आहे. या विद्यार्थ्यांनी त्यांच्या घरी लॅपटॉपवर ऑनलाईन पद्धतीने प्रसारित होणाऱ्या संपर्क सत्रास उपस्थित रहावे.

उपरोक्त कालावधीत विद्यापीठाच्या आयोजित लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा विहित वेळापत्रकाप्रमाणे होतील. परीक्षार्थी विद्यार्थ्यांनी त्यासाठी परीक्षेचे प्रवेशपत्र (हॉलतिकीट) सोबत बाळगावे. परीक्षे व्यतिरिक्त विद्यार्थी मुख्यालयात, विभागीय केंद्रांवर किंवा अभ्यास केंद्रांवर येणार नाहीत या अनुषंगाने संबंधितांनी सूचना निर्गमित कराव्यात. संशयित विद्यार्थी निदर्शनास आल्यास तो इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही यासाठी संबंधितांनी आवश्यक ती दक्षता व खबरदारी घ्यावी. विद्यापीठ मुख्यालय, विभागीय केंद्रे तसेच अभ्यास केंद्रांच्या परिसरात शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी, इ. नी गर्दी होईल असे प्रसंग टाळावेत.

तसेच अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे, कोल्हापूर व नांदेड येथील विभागीय केंद्र प्रमुखांनी त्या त्या ठिकाणच्या जिल्हा प्रशासनाने काढलेल्या सर्व आदेशांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ ज्ञानगंगा घरोघरी नासिक- ४२२ २२२

(डॉ. दिनेश भोंडे)
कुलसचिव

प्रत : (1) मा.कुलगुरू यांचे कार्यालय
(2) डॉ. अतुल वाडेगावकर, एम.के.सी.एल., पुणे
(3) विद्यापीठ संकेतस्थळ

प्रति,

सर्व विद्याशाखा/विभाग/केंद्र/कक्ष प्रमुख व विभागीय केंद्र प्रमुख यांना कळविण्यात येते की, सदरचे परिपत्रक आपल्या अधिनस्त सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे.